दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● गुरुवार दि.१४ ऑगस्ट २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक २५९ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Thursday 14 August 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 2nd ● Issue 259 ● Pages 4 ● Rate 4 Rs

**प्रतिनिधी नेमणे आहे**
लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा, तालुका, सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा.

# एकनाथांमुळेच महायुतीची सत्ता आली
# शिंदेंच्या योजनांनी राज्यात सकारात्मक वातावरण
## राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी काढला भाजपला चिमटा

### कितीही आघाड्या झाल्या तरी फरक पडणार नाही

**विधानसभा निवडणुकीत लोकांनी कुणाला निवडून द्यायचे हे ठरवले होते. आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही त्यांनी हे ठरवले आहे. त्यामुळे कुणी कितीही आघाड्या केल्या तरी काही फरक पडणार नाही. मत चोरले हे काँग्रेस व उद्धव सेनेला उशिराने सूचलेले शहाणपण आहे. लोकसभेच्या निवडणुकीनंतर आमचेच सरकार येणार म्हणून महाविकास आघाडीतील अनेक नेत्यांना मुख्यमंत्रीपदाचे स्वप्न पडत होते. काहींनी तर कोट शिवले होते. पण त्यांचा टांगा पलटी झाला. आता त्यांनी ईव्हीएमवरून गदारोळ सुरू केला आहे, असा चिमटाही उदय सामंत यांनी यावेळी काढला.**

**अमरावती (वृत्तसंस्था)**–शिवसेनेचे सर्वेसर्वा एकनाथ शिंदे यांच्यामुळेच महाराष्ट्रात पुन्हा महायुतीचे सरकार आल्याचा दावा राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केला आहे. एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री असताना वेगवेगळ्या योजना आणल्या. या योजनांमुळेच सकारात्मक वातावरण निर्मिती होऊन राज्यात महायुतीची सत्ता आली. हे सत्य कुणीच नाकारू शकत नाही, असे ते म्हणालेत. सामंत यांच्या या दाव्यामुळे महायुतीतील घटकपक्षांत वाद होण्याची शक्यता आहे.मंत्री उदय सामंत बुधवारी एका कार्यक्रमासाठी अमरावतीत आले होते. तत्पूर्वी, नागपूर विमानतळावर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्यांनी एकनाथ शिंदे यांच्यामुळेच राज्यात महायुतीचे दुसऱ्यांदा सरकार आल्याचा दावा केला. उदय सामंत म्हणाले, एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री असताना राज्यात वेगवेगळ्या योजना आणल्या. या योजनांमुळे महाराष्ट्रात एक सकारात्मक वातावरण तयार झाले. त्यामुळे राज्यात पुन्हा महायुतीची सत्ता आली. हे कुणीच नाकारू शकत नाही. यात भाजपला डिवचण्याचे किंवा वाद निर्माण करण्याचे कोणतेही कारण नाही. माझ्या वक्तव्यात कोणताही विपर्यास करणारा शब्द नाही किंवा मी श्रेय लाटण्यासाठीही बोलत नाही. उदय सामंत यांनी यावेळी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या कार्यक्रमात उद्धव ठाकरे यांना शेवटच्या रांगेत बसवण्यात आल्याचाही पुनरुच्चार केला. आमचे नेते एकनाथ शिंदे दिल्लीला जातात, तेव्हा ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या खुर्चीला खुर्ची लावून बसतात. पण उद्धव ठाकरे यांना काँग्रेसच्या बैठकीत शेवटच्या रांगेत बसवण्यात आले. यावरून त्यांची कुवत व किंमत किती आहे हे सिद्ध होते, असे ते म्हणाले.



### मनसे, महाविकास आघाडीच्या संभाव्य युतीला टोला

**उदय सामंत यांनी यावेळी मनसे व महाविकास आघाडीच्या संभाव्य आघाडीवरही भाष्य केले. राज्यात सध्या मनसे महाविकास आघाडीत जाण्याची चर्चा सुरू आहे. पण राज ठाकरे स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा अवमान करणाऱ्या राहुल गांधींसोबत जातील की नाही हे मला माहिती नाही. पण त्यांची आघाडी झाली तर राज ठाकरे हे राहुल गांधींना केव्हा ना केव्हा प्रश्न विचारतील की, स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याविषयी तुमची भूमिका काय? असे ते यावेळी आगामी विधानसभा निवडणुकीत सत्ताधारी महायुतीचाच विजय होणार असल्याचा दावा करताना म्हणाले.**

# लोकशाहीच्या संरक्षणासाठी खा.रजनीताई पाटील आक्रमक

**केज । प्रतिनिधी**

राज्यसभेच्या खासदार संसदरत्न, कायम सामाजिक व सर्वसामान्य नागरिकांचे विविध विषय अभ्यासपूर्ण आणि आक्रमकपणे संसदेत मांडणाऱ्या काँग्रेसच्या खा रजनीताई पाटील

यांनी काल इंडिया आघाडीच्या आंदोलनात आक्रमक भूमिका घेतली. निवडणूक आयोगाने घेतलेली एकतर्फी भूमिका ही लोकशाहीला घातक असून काँग्रेस पक्षाचे नेते राहुल गांधी यांनी अतिशय महत्वाच्या मुद्याला हात घातला असून यासाठी विरोधी बाकावरील सर्व खासदार या आंदोलनात सामील झाले होते.

राहुल गांधी, प्रियंका गांधी यांच्या खांद्याला खांदा लावून बीड च्या खासदार रजनीताई पाटील या आंदोलनात होत्या अक्षरशः सरकारने पोलिसांच्या दडपशाही ने हे आंदोलन दाबण्याचा प्रयत्न केला परंतु खा. राजनीताई पाटील यांनी महिला खासदार असताना देखील या विरोधाला न




जुमानता अडवण्यासाठी टाकलेले बॅरिकेट ढकलून देऊन पुढे जाण्याचा प्रयत्न केला. परंतु भेटण्यासाठी जात असताना, इंडिया आघाडीतील खासदारांना पोलिसांकडून अडवण्यात आले आणि ताब्यातही घेण्यात आले.

तरीही त्या मागे हटल्या नाहीत.मत चोरीच्या विरोधात मोठे आंदोलन केले गेले. मतमोजणीत पारदर्शकता, EVM² + VVPAT ची अनिवार्य पडताळणी आणि मतदार याद्यांतील फेरफार थांबवण्याच्या मागण्यांसाठी आंदोलन करण्यात आले

यावेळी खासदार रजनीताई पाटील आक्रमक झाल्या.

ही लढाई राजकीय नाही ही लढाई लोकशाही, संविधान आणि 'एक व्यक्ती, एक मत' या अधिकाराच्या संरक्षणाची आहे ही भूमिका घेतली. लोकशाहीची होत असलेली मुस्कटदाबी विरोधात मोर्चा आक्रमक झाला. खा रजनीताई पाटील यांनी पुढाकार घेतला.

# कन्नडचे युवा कवी लक्ष्मण वाल्डे यांचे कादंबरी क्षेत्रातही पदार्पण

**कन्नड । प्रतिनिधी**

कन्नड तालुक्यात नवोदित कवी - लेखक सातत्याने विविध विषयावर लेखन करीत आहे. विविध साहित्य संमेलने, कविसंमेलनात ते सहभागी होऊ लागले आहे. काव्य लेखनाबद्दल त्यांना पुरस्कार व पारितोषिके ही प्राप्त होत आहे. कन्नड तालुक्यात तिफण कविता महोत्सवाच्या माध्यमातून नवोदित कविंना लेखनासाठी प्रेरणा मिळत आहे. तालुक्यात ठिकठिकाणी अनेक साहित्यिक कार्यक्रम होऊ लागले आहेत. लक्ष्मण वाल्डे व ज्ञानेश्वर गायके या कविंच्या पुस्तक प्रकाशनासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अनुदान प्राप्त होऊन त्यांची पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. कन्नड तालुक्यातील नवोदित कविंच्या कवितांचा डोंगरबिया हा प्रातिनिधिक कवितासंग्रह लवकरच प्रसिद्ध होत आहे. शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले यांचे व मराठी विभागासह तालुक्यातील मान्यवर ज्येष्ठ साहित्यिकांचे



मार्गदर्शन मिळत आहे. लक्ष्मण वाल्डे हे कवी असून बहुरंगी हा त्यांचा कवितासंग्रह प्रसिद्ध असून त्यांची बाळ्या सायकल म्बुलन्सवाला ही कादंबरी नुकतीच प्रसिद्ध झाली आहे. एका सामान्य तरुणांची असामान्य कहाणी या कादंबरीत येते. या कादंबरीचे कथानक कन्नड तालुक्याशी निगडित असून कन्नड व पिशोर परिसरातील वास्तव चित्रण या कादंबरीत आले आहे. युवा पिढीत कादंबरी लिहिणारे लक्ष्मण वाल्डे हे पहिलेच लेखक ठरले आहे. या कादंबरीची प्रत त्यांनी प्राचार्य डॉ. विजय भोसले यांना देण्यात आली. कन्नडच्या नवोदित लेखकांचे कादंबरी क्षेत्रातही पदार्पण झाले आहे. यावेळी शिवाजी कॉलेज ऑफ फार्मसी चे प्राचार्य डॉ. राहुल क्षिरसागर, परिवर्तनवादी कवयित्री डॉ. प्रतिभा अहिरे, मराठी विभाग प्रमुख डॉ. शिवाजी हुसे, डॉ. रामचंद्र झाडे,डॉ. सीमा काशिद, कवी ज्ञानेश्वर गायके यांची उपस्थिती होती. प्राचार्य डॉ. विजय भोसले, डॉ. प्रतिभा अहिरे यांनी शुभेच्छा दिल्या.

# नवनिर्वाचित वैजनाथ बँकेचे संचालक प्रवीण देशपांडे यांचा चतुर्वेद प्रतिष्ठानच्या वतीने सत्कार




**केज । प्रतिनिधी**

नुकत्याच झालेल्या प्रतिष्ठित बँक वैद्यनाथ अर्बन कव्हर बँक लिमिटेड परळी च्या सर्वसाधारण निवडणुकांमध्ये नामदार पंकजाताई मुंडे व नामदार धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या निवडणुकांमध्ये जनसेवा पॅनलच्या सर्वच्या सर्व उमेदवार मोठ्या मताधिक्याने विजयी झाले असून यामध्ये केह येथील उमेदवार प्रवीण भाऊसाहेब देशपांडे यांना देखील प्रचंड मत मिळाले असून ते निवडून आले आहेत याबद्दल केज येथे चतुर्वेद प्रतिष्ठानच्या वतीने प्रवीण देशपांडे यांचा सत्कार करण्यात आला यावेळी धनंजय कुलकर्णी, चंद्रकांत पाटील, श्रीधर खोत, शिवराज मुथळे, अनंत कोकीळ, गजानन औसेकर, दिनकर नाईकवाडे, ऋषिकेश जोशी, घेवारे, किरण अस्वले आदी उपस्थित होते.

# बीड जिल्ह्यातील मातंग समाज लहुजी शक्ती सेनेच्या मुंबई मोर्चासाठी सज्ज

**बीड । प्रतिनिधी**

लहुजी शक्ती सेनेचे महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष विष्णू कसबे यांच्या आदेशानुसार व कैलास खंदारे, विलास दादा मोमीन (माजी जिल्हा परिषद सदस्य) यांच्या सूचनेनुसार, तसेच लालासाहेब दुनघव माझी लहुजी शक्ती सेना राज्य संघटक तथा माझी बीड जिल्हा अध्यक्ष प्रभारीयांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी व मातंग समाजातील बांधव मोठ्या संख्येने मुंबई मोर्चात सहभागी होणार आहेत. आरक्षणातील अ, ब, क, ड उपवर्गीकरण व न्यायाच्या हक्कासाठी लहुजी शक्ती सेनेचा महामेळावा मुंबई येथील आझाद मैदानावर १६ ऑगस्ट २०२५ रोजी



आयोजित करण्यात आला आहे. या मोर्चात बीड जिल्ह्यातून हजारो कार्यकर्ते, महिला व युवक मोठ्या उत्साहाने सहभागी होणार आहेत.बीड तालुका अध्यक्ष माननीय वीर किसन वाघमारे साहेब यांच्या अध्यक्षतेखाली १५ ऑगस्ट रोजी संध्याकाळी बीडवरून मोर्चासाठी प्रस्थान होणार आहे. या निमित्ताने जिल्ह्यातील सर्व मातंग समाज बांधव, महिला भगिनी व पदाधिकाऱ्यांना मोर्चात सामील होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# अंबाजोगाईच्या शासकीय रुग्णालयात महिला रुग्णांची हेळसांड, सुविधांचा अभाव




**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

राज्यातील सर्वसामान्य नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचे असलेल्या अंबाजोगाई येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात येणाऱ्या महिला रुग्णांची हेळसांड होत असून आरोग्य मंत्र्यांनी याकडे लक्ष देण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयात मोठ्या प्रमाणात बाहेरगावाहून महिला रुग्ण उपचारासाठी दाखल होत असतात.यामध्ये डिलिव्हरीसाठी मोठ्या संख्येने महिला येत असतात.डिलिव्हरी झाल्यानंतर बी, इमारतीतील सर्जिकल विभागातील दाखल केलेल्या महिलांना आवश्यक सुविधा दिल्या जात नसल्याची तक्रार नातेवाईकांकडून होत आहे. महिला रुग्णांना लागणा-या वस्तुंची ड्युटीवर असणा-या स्टाफ आणि डॉक्टरांना मागणी करूनही दिल्या जात नाहीत.राज्य सरकार आरोग्य सेवेवर करोडो रुपये खर्च करीत आहे.मात्र त्याचा रुग्णांना फायदा होत नसेल तर हा पैसा व साहित्य जाते कुठे याची चौकशी होण्याची गरज आहे.

संपादकीय

# सखी झाल्या उद्योजिका



मैत्री ही या जगातली एक सुंदर गोष्ट आहे. निखळ मैत्रीमुळे आयुष्य समृद्ध होतं. अशाच त्या दोघींच्या मैत्रीने त्यांना यशस्वी उद्योजिका म्हणून घडवले. ही गोष्ट आहे शौरवी मलिक आणि मेघना नारायण यांची, त्यांच्या स्लर्प फार्मची.लंडनमध्ये एका दिवाळी पार्टीत शौरवी आणि मेघनाची भेट झाली. परदेशात त्यांची मैत्री घट्ट झाली. मेघना बंगळूरूमध्ये वाढली. ती राष्ट्रीय स्तरावरील जलतरणपटू होती. तिला ऑक्सफर्डमध्ये शिक्षण घेण्यासाठी ऱ्होड्स शिष्यवृत्ती मिळाली. त्यानंतर तिने हार्वर्ड बिझनेस स्कूलमधून एमबीए केले. पुढे मॅककिन्से या नामांकित कंपनीमध्ये सात वर्षे काम केले. शौरवी नवी दिल्लीत लहानाची मोठी झाली. केंब्रिज विद्यापीठात तिने अर्थशास्त्राचा अभ्यास केला. जेपी मॉर्गनसारख्या जगप्रसिद्ध कंपनीमध्ये तिने काम केले. ती लंडनमधील सर रिचर्ड ब्रॅन्सन यांच्या व्हर्जिन ग्रुपच्या ग्रुप होल्डिंग एंटिटीमध्ये गुंतवणूक व्यवस्थापक देखील होती.शौरवी आणि मेघना यांच्यामध्ये विविध उद्योजकीय कल्पना यांच्याविषयी नेहमी चर्चा व्हायच्या. मात्र त्या तेवढ्यापुरत्याच असत. या दोघींच्या चर्चेचा अजून एक विषय असायचा तो म्हणजे मुलांचा. दोघींना मुले असल्याने त्यांचे संगोपन करताना येणाऱ्या अडचणी यावर नेहमी चर्चा व्हायची. आपली मुलं अरबट चरबट काहीतरी खात असतात असा तक्रारीचा सूर देखील त्या चर्चेत असे. मुलांनी काय खाल्लं पाहिजे या समस्येवरील उपाय शोधताना त्यांना जो उपाय सापडला त्यातून निर्माण झाला स्लर्प फार्म नावाचा उद्योग.


पालक म्हणून त्यांना मुलांसाठी आवश्यक अशा पौष्टिक खाद्य पर्यायांची कमतरता भासली. ते त्याबद्दल काहीतरी करू इच्छित होते. ऑक्टोबर २०१६ मध्ये त्यांच्या लक्षात आले की बहुतेक सुपरमार्केटच्या शेल्फमध्ये फक्त मुलांसाठी गहू किंवा तांदळापासून बनवलेले पदार्थ असतात. त्यामध्ये मेद आणि साखरेचे प्रमाण जास्त होते जे अगदी आरोग्यास अपायकारक होते. तेव्हा त्यांनी स्लर्प फार्म सुरू केला. या दोघींना मदत करायला उमंग भट्टाचार्यदेखील आला. फोटोग्राफी, ग्राफिक डिझाइन आणि व्हिडीओ आर्टमध्ये १५ वर्षांहून अधिक अनुभव असलेल्या उमंगने स्लर्प फार्मला विशिष्ट ओळख मिळवून दिली.त्यांनी पहिल्यांदा मुलांसाठी सेंद्रिय फळे आणि भाज्यांची प्युरी बनवली. मात्र त्यांना खूप कमी मागणी होती. हळूहळू त्यांनी लहान मुलांसाठी निरोगी, चविष्ट आणि झटपट बनवता येईल असा नाश्ता आणि जेवणाचा पर्याय दिला. त्यांच्या उत्पादनात प्रिझर्व्हेटिव्हज, कृत्रिम रंग किंवा फ्लेवर्स, ट्रान्स फॅट्स किंवा स्टेबिलायझर्स अशा आरोग्यास बाधक घटक त्यात सामील नसतात असा त्यांचा दावा आहे.शौरवी आणि मेघना यांनी प्रत्येक उत्पादन श्रेणीसाठी व्यंजन विकास, व्यावसायिक वाढ आणि गुणवत्ता नियंत्रणासाठी तज्ज्ञांची मदत घेतली आहे. आम्ही विशिष्ट उत्पादने बनवत नाही, आम्ही चांगल्या दर्जाचे घटक वापरतो. उदाहरणार्थ, तांदूळ आणि गव्हाच्या तुलनेत बाजरीची किंमत प्रति किलो जास्त असते. आमचे खरेदीदार हे दररोजचे पालक आहेत, जे त्यांच्या मुलांसाठी त्रासमुक्त, निरोगी आणि पौष्टिक अन्न उत्पादने शोधत आहेत. त्यांना आरोग्याची काळजी आहे. ते स्लर्प फार्म निवडतात कारण आमच्या उत्पादनांमध्ये रिफाइंड पीठ, ट्रान्स–फॅट, जास्त मीठ आणि साखर, रंग आणि प्रिझर्व्हेटिव्हज नसतात, असं मेघना म्हणतात.स्लर्प फार्मच्या उत्पादन श्रेणीमध्ये सेंद्रिय धान्य, खिचडी मिक्स, बाजरी, ओट, दलिया, बाजरी पॅनकेक्स आणि वॅफल मिक्स, केळी आणि चॉकलेट चिप पॅनकेक्स, बाजरी डोसा, बीटरूट ओट्स डोसा आणि बरेच काही समाविष्ट आहे. याशिवाय रागी आणि ज्वारीसारख्या भरड धान्यापासून बनवलेले तारेच्या आकाराचे मंची आणि पफ देखील उपलब्ध आहेत, जे चवदार आहेत. बेकिंग रेंजमध्ये विविध प्रकारचे केक मिक्सदेखील समाविष्ट आहेत.स्लर्प फार्मला एलाज किचन किंवा ऑर्गेनिक्ससारखे बनण्याची आकांक्षा आहे. स्लर्प फार्मची उलाढाल काही कोटींमध्ये होत आहे. या दोघींचा असा विश्वास आहे की, ब्रँड आणि टिकाऊ उत्पादने तयार करण्याचा प्रवास खूप लांब आहे. या प्रवासासाठी उत्तम टीम असणे आवश्यक आहे. एकट्याने हे काम करणे कठीण आहे. एक अन्न कंपनी म्हणून, स्लर्प फार्मला कोरोना काळात आणि त्यानंतरच्या लॉकडाऊन दरम्यान काम करण्याची परवानगी देण्यात आली. आव्हान अनेक होते. लॉजिस्टिक्स अनिश्चित होते. सुरुवातीला अनेक व्यत्यय आले. त्यांनी कच्चा माल, पॅकेजिंग आणि क्रेडिटसारख्या दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकाच्या परिणामांचे व्यवस्थापन करण्यासाठी आणि ते कमी करण्यासाठी कठोर परिश्रम केले. अल्पावधीत वस्तूंचा पुरवठा करणे हे आव्हानात्मक होते. या काळात स्लर्पने प्रत्यक्षात तिप्पट वाढ पाहिली. स्लर्पचे उत्पादन आणि ब्रँड कोविड–१९ मुळे प्रभावित झाले नाही. हा कंपनीचा भरभराटीचा काळ होता.ट्रॅक्सएन डॉट कॉम या वेबसाईटनुसार स्लर्प फार्मकडे आज १०० हून अधिक कामगार कार्यरत आहेत, तर कंपनीची ५०० कोटी रुपयांहून अधिक उलाढाल आहे.ऑगस्ट महिन्याचा पहिला रविवार मैत्री दिन म्हणून जगभर साजरा केला जातो. एकमेकांच्या सहाय्याने मैत्रीसोबत आयुष्य कसे समृद्ध करायचे याचे शौरवी आणि मेघना या उत्तम उदाहरण आहेत.

# सुधारणांचा प्रयत्न




तुमच्या स्वप्नांना कधीही मर्यादा घालू नये, या वचनाचा दाखला देत केंद्र सरकारने संसदेत क्रीडा प्रशासन विधेयक मंजूर केले. क्रीडा प्रशासन विधेयक मंजूर झाल्याबद्दल अनेक क्रीडा संघटनांनी कौतुक केले आणि हा क्षण अभिमानाचा असल्याचे नमूद केले. कारण क्रीडा प्रशासन विधेयक भविष्यासाठी नवीन युग निर्माण करणारे आहे. क्रीडा क्षेत्रात बोकाळलेल्या अनेक गैरप्रथांना आळा घालणारे आहे. भारत आता ऑलिम्पिक २०३६ची तयारी करत आहे. त्यापूर्वी हे विधेयक म्हणजे भारताच्या आतापर्यंतच्या क्रीडा क्षेत्रातील वाटचालीला सहाय्यभूत होणार आहे. क्रीडा संघटनांमध्ये जबाबदारी, न्याय आणि चांगले प्रशासन निश्चित करेल असे केंद्रीय क्रीडामंत्री मनसुख मांडविया म्हणाले ते योग्यच आहे. कारण यापूर्वी भारतात कशी परिस्थिती होती हे पाहिले तर आपल्यालाच आपली दया येते. क्रिकेट सोडले तर अन्य खेळांची अवस्था निव्वळ हजेरी लावून येण्यापुरती होती. ऑलिम्पिक स्पर्धेसाठी आपले संघ जायचे ते निव्वळ आपली नोंद करण्यापुरते. काही संघातील खेळाडूंना तर पायात चांगले बूटही नव्हते, इतकी आपली अवस्था दारुण होती. याला सणसणीत अपवाद होता, क्रिकेटचा, तो अर्थातच क्रिकेटमध्ये मात्र भारत एकामागून एक यश मिळवत होता आणि त्यामुळे क्रिकेटमध्ये यश मिळाले. त्यातही पाकिस्तानला हरवले, की आपण कृतकृत्य होत असू. पण, नंतरच्या काळात परिस्थिती बदलली आणि आपले खेळाडू पदके घेऊन यायला लागले. २०२० मध्ये झालेल्या टोक्यो ऑलिम्पिक स्पर्धेत भारताने तब्बल सात पदके आणली. त्यात एक सुवर्ण, दोन रजत आणि चार कांस्य पदके होती. इतर विशेषतः चीनच्या तुलनेत ही पदकसंख्या फारच कमी वाटेल. पण भारतासाठी ही फार मोठी झेप होती आणि ही आतापर्यंतची भारताची सर्वाधिक मोठी संख्या आहे. क्रिकेट सोडले तर भारतात अन्य क्रीडा स्पर्धांना कुणी लक्ष देत नाही आणि त्यांना प्रायोजकही मिळत नाही. त्यांच्या खेळाडूंवर अन्याय होतो. इतकेच काय, पण क्रिकेटमध्येही पुरुष सोडले तर महिला क्रिकेटच्याबाबतीत असेच सांगता येईल. पण ही परिस्थिती गेल्या काही वर्षात बदलली आहे. नवीन क्रीडा विधेयकामुळे त्या परिस्थितीला आणखीच धार येईल अशी परिस्थिती आहे. भारतात गुणवान खेळाडू आहेत आणि ते पराक्रमही करू शकतात. पण क्रीडा क्षेत्रातील वशिलेबाजी, चुकीच्या खेळाडूंची वर्णी लावणे यांसारखे अनेक गैरप्रकार घडतात. त्यामुळे खरा खेळाडू क्षमता असूनही या क्षेत्रापासून दूर राहतो. आता तसे होणार नाही. कारण क्रीडा संघटनांची जबाबदारी प्रशासन निश्चित करेल. क्रीडा क्षेत्रात अनेक गैरप्रकार चालत होते आणि त्याला बऱ्याचशा प्रमाणात क्रीडा संघटना जबाबदार होत्या. आता त्यांची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. भारताचे लक्ष्य आता आहे ते २०३६च्या ऑलिम्पिक स्पर्धेसाठी संघ तयार करण्याचे आणि त्यासाठी हे धोरण उपयुक्त आहे. तळागाळातील लोकांना प्रोत्साहन देणे याशिवाय खेळाडूंना योग्य प्रशिक्षण आणि सुविधा पुरवणे याचा धोरणात समावेश आहे. क्रीडा सुविधांमध्ये पायाभूत सुधारणा होत आहेत आणि त्यासाठी मैदानांच्या विकासांवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने हे विधेयक अतिशय उपयुक्त आहे. पण, ऑलिम्पिकची तयारी करतानाच क्रिकेट सोडून अन्य खेळांमध्ये भारताची कशी प्रगती होईल हे पाहणे गरजेचे आहे. भारताच्या दिव्या देशमुखने नुकतीच बुद्धिबळाची विश्वचषक स्पर्धा जिंकली. पण तिचे यश देदीप्यमान असूनही त्याला म्हणावी तशी प्रसिद्धी मिळालीच नाही. तसे होऊ नये त्यादृष्टीने राष्ट्रीय क्रीडा विधेयकात तरतूद केली जावी ही अपेक्षा होती. आता या धोरणात राष्ट्रीय क्रीडा संस्थांवर देखरेख करणे आणि राष्ट्रीय क्रीडा न्यायाधिकरण स्थापन करण्याची स्वागतार्ह तरतूद आहे. या धोरणात अँटी डोपिंग उपाययोजनांचा विचार करण्यात आला आहे. असे हे सर्वंकष धोरण आहे आणि त्याची आवश्यकता होती. कारण क्रीडा संस्थांमध्ये पदाधिकाऱ्यांची मनमानी वाढत चालली होती आणि खेळाडू त्याविरोधात आवाज उठवू शकत नव्हते. कारण त्यांनी आवाज उठवला तर त्यांचे करिअर संपवण्याची ताकद या पदाधिकाऱ्यांत होती. या धोरणाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे संबंधित खेळाडूंच्या निवडीविषयक वाद राष्ट्रीय क्रीडा न्यायाधिकरणापर्यंत नेऊ शकतील आणि त्यांच्या निकालाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले जाऊ शकेल.राष्ट्रीय क्रीडा प्रशासनाच्या कार्यप्रणालीत सकारात्मक परिवर्तन होण्यासाठी हे अत्यंत मोठे आणि सकारात्मक बदल सरकारने केले आहे. हे सारे ऑलिम्पिक २०३६ची तयारी करण्यासाठी असून, त्यात योग्य आणि सकारात्मक बदल आहेत. अनेक क्रीडा संस्था अशा आहेत, की ज्यांनी स्वत:च्या घटनांमध्ये फेरबदल केले. वर्षानुवर्षे आपली कसलीच माहिती दिली नाही. त्यांच्यावर आता अनियमितता प्रकरणी सरळ कारवाई केली जाऊ शकेल. ही फार मोठी सुधारणा आहे. अशा संस्थानी अनेक खेळाडूंचे करिअर संपवले आहे. वशिलेबाजी तर प्रचंड बोकाळली आहे. या सर्वांना आळा घालू शकेल असे हे विधेयक आहे. २०४७ सालासाठी भारत विकसित देश म्हणून गौरवाचे स्थान पटकावत असताना क्रीडा विश्वात भारताचा झेडा फडकला पाहिजे या सद्हेतूने मोदी यांनी या क्रीडा धोरणाची सुरुवात केली असे म्हणावे लागेल. राष्ट्रीय क्रीडा मंडळ स्थापन केले जााईल आणि कॉर्पोरेट संस्था म्हणून ती काम करेल, या विधेयकात अनेक तरतुदी आहेत. राष्ट्रीय क्रीडासंस्था आणि प्रादेशिक क्रीडामंडळाची स्थापना करण्याची तरतूद आहे. पण मुख्य म्हणजे खेळाडूंचा विकास आणि भारतीय मातीतील खेळांना प्रोत्साहन देण्याचे प्रयत्न तेथे अधिकाऱ्यांनी मनापासून करण्याची अपेक्षा आहे. ही विधेयकातून पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे. कारण देश आता कोणत्याही क्षेत्रात मागे नाही; तर तो क्रीडा क्षेत्रात मागे राहून कसे चालेल याचे उत्तर येणाऱ्या पिढ्यांना द्यावे लागेल.

# आरोग्य यंत्रणा सक्षम होणार का?



नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा येथे काही दिवसांपूर्वी बोगस डॉक्टरवर झालेली कारवाई ही धाक दाखविण्यासाठी होती का? इतर बोगस डॉक्टरांचे काय, असा सवाल उपस्थित केला जात आहेनाशिक जिल्ह्याच्या ग्रामीण भागात सरकारी वैद्यकीय क्षेत्र पुरते कोलमडले असल्याचे चित्र मागील काही घटनांवरून दिसून येत आहे. काही प्राथमिक आरोग्य केंद्रांत औषध साठा आहे, तर डॉक्टर नाहीत, काही ठिकाणी डॉक्टर आहेत, तर औषध साठा नाही आणि दोन्ही असतील, तर संबंधित आरोग्य कर्मचारी परिचारिका, वॉर्डबॉयच बेपत्ता असतात. रात्रपाळीतील डॉक्टर अन् कर्मचारी तर, कधीतरी कामाच्या ठिकाणी दिसतात. त्यामुळे अडलेल्या रुग्ण व त्यांच्या नातेवाइकांना नाइलाजास्तव खासगी डॉक्टरांकडे जाऊन महागडा औषधोपचार, तसेच शस्त्रक्रिया कराव्या लागत आहेत. दरम्यान जिल्हा आरोग्य अधिकारीदेखील विशाखा समितीच्या चौकशीत अडकले होते. तत्कालीन सीईओ अशीमा मित्तल यांनी जाताना त्यांना क्लीनचिट दिली असली तरी, काही संघटनांकडून त्यांच्या चौकशीची मागणी जोर धरू लागली आहे.नाशिक जिल्ह्यात पेठ, सुरगाणा, त्र्यंबकेश्वर हरसूल, इगतपुरी ही तालुके आदिवासीबहुल आहेत. या तालुक्यांमधील अनेक गावांत रस्ते, वीज पोहोचलेली नाही. त्यामुळे त्याचा आरोग्य यंत्रणेवर देखील मोठा परिणाम झालेला दिसून येत आहे. अनेक महिलांना प्रसूतीसाठी रुग्णालयात येण्यासाठी रस्ते नसतात. रुग्णालयात आल्यानंतर त्या ठिकाणी डॉक्टर आणि अत्यावश्यक अशी मशीनरी देखील नसते. अनेक महिलांची प्रसूती ही रस्त्यात किंवा घरी देखील झाली आहे. त्यामुळे जिल्हा आरोग्य यंत्रणा कोलमडली असल्याचे चित्र आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी देखील ग्रामीण भागात दौरे करत आहे, परंतु त्याचा अद्याप काही उपयोग झाला नसल्याचे समोर आले आहे.

नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा येथे काही दिवसांपूर्वी बोगस डॉक्टरवर झालेली कारवाई ही धाक दाखविण्यासाठी होती का? इतर बोगस डॉक्टरांचे काय, असा सवाल उपस्थित केला जात आहे. जिल्ह्यात यापूर्वी ग्रामीण भागात अनेक बोगस डॉक्टर सापडले आहेत; परंतु या डॉक्टरांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने रुग्णांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. जिल्ह्यातील ग्रामीण भागांत जिल्हा परिषदेमार्फत आरोग्य सेवा दिली जाते. काही दिवसांपूर्वीच श्री कपालेश्वर प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्याने दुर्गम भागातून केंद्रात प्रसूतीसाठी आलेल्या आदिवासी महिलेला रुग्णालयात दाखल न करता हुसकावून दिले होते. या प्रकरणी जिल्हा परिषदेने चौकशी करत या डॉक्टरांच्या विरोधातील अहवाल राज्य शासनाकडे पाठवला आहे. दरम्यान, संबंधित डॉक्टरची विभागीय स्तरावरून चौकशीदेखील झाली; परंतु पुढे काहीच झाले नाही.

जिल्ह्यात काही महिन्यांत अंजनेरी (त्र्यंबकेश्वर), चिंचओहोळ (मालेगाव), चांदोरी (निफाड) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांबाबत तक्रारी प्राप्त झाल्या होत्या; परंतु त्याबाबत कारवाई गुलदस्त्यातच आहे. कपालेश्वर प्राथमिक आरोग्य केंद्रात रात्री अकराच्या सुमारास कल्पना भोये (रा. खडकी, ता. कळवण) प्रसूतीसाठी गेल्या होत्या. मात्र, तिला रुग्णालयात दाखल करून न घेता डांगसौंदाणे ग्रामीण रुग्णालयात जाण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला. महिलेचे वडील काकाजी बागूल व नातेवाइकांना मद्यधुंद अवस्थेत असलेल्या या डॉक्टरने त्यांच्यासोबत असलेल्या बीडच्या मित्राने त्या महिलेला व नातेवाइकांना अक्षरशः हुसकावून लावले. त्यानंतर या कुटुंबाने तत्काळ डांगसौंदाणे ग्रामीण रुग्णालयात नेले. तेथे त्या महिलेची प्रसूती झाली. दुसऱ्या दिवशीही डॉक्टर मद्यधुंद स्थितीत असल्याचे संबंधित महिलेच्या नातेवाइकांनी सांगितले; परंतु पुढे काहीच होत नसल्याने नाराजी व्यक्त होत आहे. जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर, चिंचओहोळ (मालेगाव), चांदोरी (निफाड)सह इतर काही ठिकाणच्या प्राथमिक आरोग्य केंद्राची परिस्थितीही फारशी वेगळी नाही. अनेक वाईट अनुभव ग्रामस्थांना सातत्याने येत आहेत; परंतु प्रशासन याबाबत कोणतीही ठोस कारवाई करताना दिसून येत नाही. त्यामुळे पर्यायाने सर्वसामान्य नागरिकांना बोगस डॉक्टरांच्या दवाखान्याची वाट धरावी लागत आहे. हे बोगस डॉक्टर जिल्ह्यातील अनेक भागांत कार्यरत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहेत; परंतु दिखाऊ कारवाई काही उपयोगाची नाही.ठोस अशा उपाययोजना करण्याची खरी गरज निर्माण झाली आहे. अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या हजेरीसाठी तत्कालीन सीईओ आशिमा मित्तल यानी ॲपदेखील कार्यान्वित करण्याचे आश्वासन दिले होते; परंतु हे आश्वासनदेखील हवेत विरले आहे. आजही अनेक अधिकारी, कर्मचारी कामावर न जाता मुख्यालयी येत असल्याचे चित्र आहे. जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांचे जिल्हाभर दौरे खूप सुरू असतात; परंतु त्या दौऱ्यांचे फलित अद्याप दिसून येत नाही. आरोग्य अधिकाऱ्यांना विशाखा समितीकडून त्यांना तात्पुरता दिलासा मिळाला असला तरी चौकशीच्या फेऱ्यात सापडण्याची शक्यता नाकारता येत नाही. या सर्व गोष्टीवर मात करून आगामी काळात आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम होईल, अशी अपेक्षा व्यक्त करूया.

## गेवराईत सत्संग मेळावा उत्साहात संपन्न

# अध्यात्म आणि विज्ञानाची सांगड घालून सेवा केंद्रातून डोळस श्रद्धा व मनशांतीचे काम-मोरे

**गेवराई । प्रतिनिधी**
श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रातून अध्यात्म आणि विज्ञानाची सांगड घालून डोळस श्रद्धा सेवाभाव या माध्यमातून मनशांती करण्याचे काम भारतासह २१ देशात केले जात असून हा सेवा मार्ग घराघरात, मनामनात पोहोचवणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन गुरुवर्य पुत्र चंद्रकांत ( दादासाहेब ) मोरे यांनी गेवराई येथे आयोजित सत्संग मेळाव्यात केले.

अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ श्री क्षेत्र त्रंबकेश्वर जिल्हा नाशिक यांच्या वतीने सुप्रजन्यवृष्टी व राष्ट्र कल्याणार्थ श्री रुद्र लिंगार्चन सोहळा गेवराई येथील भाग्यलक्ष्मी मंगल कार्यालयात दिनांक १२ ऑगस्ट २०२५ रोजी आयोजित करण्यात आला होता. या सत्संग मेळाव्यात ते बोलत होते. याप्रसंगी चिंतेश्वर संस्थांचे मठाधिपती दिलीप महाराज घोगे यांचे प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, युवा नेते रोहित पंडित, श्री स्वामी समर्थ सेवा केंद्राच्या गेवराई तालुका केंद्र निरीक्षक प्रतिनिधी सौ स्वरूपाताई रोहित पंडित, सौ गीता भाभी पवार, युवा नेते रणवीर पंडित आदींनी गुरुपुत्र चंद्रकांत ( दादासाहेब ) मोरे यांचे पुष्पहार करून स्वागत केले.

पुढे बोलताना गुरुपुत्र चंद्रकांत (दादासाहेब) मोरे म्हणाले की, श्री स्वामी समर्थ सेवा मार्गाच्या ग्राम अभियानांतर्गत १८ विभागाच्या माध्यमातून २० टक्के अध्यात्म आणि ८० टक्के सामाजिक उपक्रम राबविले जातात. अध्यात्म आणि विज्ञान यांची सांगड घालून डोळस श्रद्धा, सेवाभाव यामधून



मनःशांती प्रदान करण्याचे काम भारत देशासह जगातील २१ देशांमध्ये हजारो सेवा केंद्राच्या माध्यमातून चालू आहे. या सेवेचा कोट्यावधी भाविक अनुभव घेत आहेत. हरवलेली मनःशांती पुनर्जिवीत करण्यासाठी श्री स्वामी समर्थ सेवा घराघरात, मनामनात पोहोचवणे ही खरी स्वामींची सेवा आहे असेही ते म्हणाले.

या कार्यक्रमाची सुरुवात दिपप्रज्वलन, छत्रपती शिवाजी महाराज आणि श्री स्वामी समर्थ महाराज यांचे पूजन करुन झाले.

याप्रसंगी गेवराई तालुक्यातील श्री स्वामी समर्थ भाविकांसह सेवेकऱ्यांनी परिश्रम घेतले. शहरासह तालुक्यातील सर्व साप्ताहिक केंद्रातील महिला, पुरुष, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा मेळावा यशस्वी करण्यासाठी श्री स्वामी समर्थ सेवा केंद्राच्या गेवराई तालुका केंद्र निरीक्षक प्रतिनिधी सौ स्वरूपाताई रोहित पंडित यांच्यासह त्यांच्या सहकारी सेवाकरांनी परिश्रम घेतले.

# जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत कैलाश मानसरोवर यात्रेसाठी पुन्हाएकदा रवाना



**मुंबई । प्रतिनिधी**
अतिशय खडतर असलेली कैलाश मानसरोवर यात्रा, परंतु पुन्हा एकदा यात्रा करून महादेवाचे दर्शन घ्यावे व देवाचे आभार मानावे यासाठी रायगड जिल्हा अध्यक्ष महेंद्रशेठ घरत आपल्या सहकार्यासोबत दिनांक १० ऑगष्ट रोजी रवाना झाले.

महादेवावर अपार श्रद्धा असलेले महेंद्रशेठ घरत ह्यांनी २०१८ साली कैलाश यात्रा केली होती. त्यानंतर त्यांचे आयुष्यचं बदलून गेले, त्यांना यश व आर्थिक सुबत्ता मिळाली. त्यानंतर तर त्यांची देवावरची श्रद्धा अजून दृढ झाली व जे काही आपल्याला मिळालेय ते देवाचे देणे आहे आपण आपल्या गरजे पुरते ठेऊन गोरगरिबांना मदत, दानधर्म ते करत राहिले. त्यानंतर ते समाजात दानशूर व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जाऊ लागले, आपल्या घरी आलेला एकही गरजू रिकाम्या हाती परत जाणार नाही याची काळजी ते घेऊ लागले.गरिबांच्या कल्याणासाठी देवाने आपल्याला अपेक्षेपेक्षा भरभरून दिल्याने महादेवाचे आभार मानावे व त्यांच्या आशिर्वाद घ्यावा यासाठी ते आपले सहकारी वैभव पाटील, मुरलीधर ठाकूर व प्रित म्हात्रे यांच्यासह पुन्हा एकदा कैलाश यात्रेला रवाना झाले.

# रक्षाबंधन निमित्त प्रवासी बंधू कडून एसटीला १३७ कोटी रुपयांची ओवाळणी-परिवहन मंत्री सरनाईक

**नवी मुंबई । प्रतिनिधी**
यंदा रक्षाबंधन आणि त्याला जोडून आलेल्या सुट्ट्यांमुळे ८ ते ११ ऑगस्ट या चार दिवसांमध्ये प्रवाशांनी तुडुंब भरलेले एसटीमधून महामंडळाला १३७.३७ कोटी रुपयांची उत्पन्न मिळाले आहे. विशेष म्हणजे ११ ऑगस्टला एका दिवशी तब्बल ३९ कोटी रुपयांचे उत्पन्न महामंडळाला प्रवासी वाहतुकीतून मिळाले आहे. यंदाच्या आर्थिक वर्षातील हे विक्रमी उत्पन्न आहे. अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

मंत्री सरनाईक म्हणाले की, दरवर्षी एसटीला रक्षाबंधन आणि भाऊबीज (दिवाळी ) या दोन दिवसात विक्रमी उत्पन्न मिळत असते. कारण, या दिवशी भाऊ बहिणीकडे किंवा बहिण भावाकडे असे प्रवासी दळणवळण मोठ्या प्रमाणामध्ये होते. परिणामी गेली कित्येक वर्ष रक्षाबंधनच्या सणाच्या कालावधी एसटीला त्या वर्षातील विक्रमी उत्पन्न मिळत आले आहे. यंदा रक्षाबंधन आणि त्याच्या दुसऱ्या दिवशी एसटीला प्रवाशांची प्रचंड गर्दी झाली होती. रक्षाबंधन च्या आदल्या दिवशी म्हणजे शुक्रवारी ३०.०६ कोटी रुपये रक्षाबंधन दिवशी म्हणजे शनिवारी ३४.८६ कोटी व दुसऱ्या दिवशी म्हणजे रविवारी ३३.३६ कोटी रुपये तर सोमवारी तब्बल ३९..९ कोटी इतके विक्रमी उत्पन्न एसटीला मिळाले. रक्षाबंधन सणाच्या निमित्ताने ८-११ ऑगस्ट या ४ दिवसात १ कोटी ९३ लाख प्रवाशांनी एसटीमधून सुरक्षित प्रवास केला आहे. त्यामध्ये महिला प्रवाशांची संख्या तब्बल ८८ लाख आहे.

रक्षाबंधन सणानिमित्त एवढ्या मोठ्या प्रमाणात प्रवाशांनी दिलेल्या प्रतिसादाबद्दल एसटी महामंडळाचे अध्यक्ष व परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आभार मानले आहेत. तसेच आपल्या घरी सण असून देखील कर्तव्याला प्राधान्य देत अत्यंत मेहनतीने काम करुन विक्रमी उत्पन्न आणणाऱ्या एसटी कर्मचाऱ्यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे.



# ॲड.राज पाटीलांना वीर शिवछत्रपती महाराष्ट्र रत्न पुरस्कार प्रदान

## सामाजिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचा गौरव

**बीड । प्रतिनिधी**
लढा दुष्काळाशी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष अँड राज पाटील यांना सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल वीर छत्रपती महाराष्ट्र रत्न पुरस्कार व अजिंक्यतारा २०२५ चा पुरस्कार अहिल्यानगर येथे रविवार दि १० ऑगस्ट रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत देण्यात आल्याने त्यांच्यावर सर्वत्र अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

वडवणी तालुक्यातील तिगावचे विद्यमान सरपंच तथा सरपंच परिषदेचे जिल्हा कार्याध्यक्ष अँड राज पाटील यांनी लढा दुष्काळाशी फाउंडेशनच्या माध्यमातून निसर्गसंवर्धन, जलसंधारण, शेती रस्ते, वृक्षारोपण, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, तसेच कोरोना काळात गरजूंना अन्नधान्य व आरोग्यविषयक साहित्य पुरविण्याचे कार्य सातत्याने केले आहे. त्यांनी आजपर्यंत हजारो वृक्षांचे वाटप केले असून, समाजात रक्तदानासह अवयव दान व मरणोत्तर



देहदान जनजागृती सोबत, स्वतः ५० वेळा रक्तदान केले आहे, २७ वेळा रक्तदान शिबिर आयोजन व अवयव दान, मरणोत्तर देहदान फॉर्म भरला आहे. गावचे सरपंच म्हणून कार्य करताना त्यांनी सरपंच परिषदेचे जिल्हा कार्याध्यक्ष म्हणून शेकडो सरपंचांच्या समस्या मांडून त्यांचे समाधान करण्याचा प्रयत्न केला आहे. शेतकऱ्यांसाठी, शेती रस्ते व जलसंधारणाच्या माध्यमातून मोठे काम उभे केले आहे. तसेच मराठा आरक्षणाच्या लढ्यातही गेल्या दहा वर्षांपासून त्यांचा सक्रीय सहभाग राहिला आहे. त्यांच्या या कार्याची दखल अहिल्यानगर येथील अनाथ सेवक सामाजिक कल्याण संस्था महाराष्ट्र या संस्थेने घेतली. वीर शिव छत्रपती महाराष्ट्र रत्न पुरस्कार व अजिंक्यतारा २०२५ चा पुरस्कार नगर सेवक डॉ. सागर बोरुडे,रिल स्टार शिवानी बनकर क्टर सचिन चव्हाण, क्टर अर्जुन अंबेकर, सस्थेचे अध्यक्ष तुषार बोरुडे, अँकर सिमा डुकरे यांच्या हस्ते देण्यात आला. त्यांच्यावर सर्व स्तरांमधून अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

**मित्रपरिवार आणि पत्रकार मंडळींचे सहकार्य कोणतेही समाजकार्य तन मन धनाने केले तर मानसिक समाधान मिळते. गोर गरीबांना व गरजवंतांना मदत करणे, झाडे लावणे, गोर गरीब शेतकऱ्यांच्या मुला मुलींना शालेय साहित्य देणे, जो गरजु माझ्याकडे मदत मागायला आला तो कधीच खाली हाताने जाऊ देत नाही. त्यांच्या समस्या सोडविणे व त्यांना मदत करण्यात मला अनंद मिळतो. त्यांच्या आशिर्वादाने गावकऱ्यांच्या सहकार्याने , मित्र परीवार आणि वडवणी तालुक्यातील तसेच बीड जिल्ह्यातील सर्व पत्रकारांचे मार्गदर्शन आणि सहकार्य कायम मिळत असते. आमच्या लढा दुष्काळाशी टीमच्या कामाची दखल घेत महाराष्ट्रातून अनेक सन्मान व पुरस्कार मिळत आहेत. सर्व मित्र परिवार व पत्रकार बांधवांचे आभार व धन्यवाद**

**-अँड राज पाटील**
**(अध्यक्ष लढा दुष्काळाशी फाउंडेशन )**

# प्रसाद खामकर यांची खासदार प्रतिनिधि पदी



**अहिल्यानगर** । प्रतिनिधी
पारनेर तालुक्यातील हंगा गावचे रहिवासी असनारे समाजसेवक श्री. प्रसाद खामकर यांची अधिकृत खासदार प्रतिनिधि म्हनुन नियुक्ती झाली आहे ! बिहार राज्यातिल औरंगाबाद लोकसभा मतदारसंघाचे खासदार तसेच राष्ट्रीय जनता दलाचे लोकसभेतिल गटनेते श्री. अभय कुमार सिन्हा यांनी त्यासंदर्भात श्री. खामकर यांना तसे अधिकृत पत्र दीले आहे. देशाची आर्थिक राजधानी मुंबई येथिल विविध सरकारी कार्यालयांमध्ये जनतेचे प्रश्न सोडवन्यासाठी तसेच जनतेच्या समस्यांचे निराकरण करन्यासाठी प्रसाद खामकर यांची अधिकृत खासदार प्रतिनिधि म्हनुन नियुक्ती करन्यात आल्याचा पत्रात म्हटले आहे, पत्र सुपूर्त करताना खासदार सिन्हा म्हनाले की समाज सेवेचा मनात निस्वार्थ भाव आसनाऱ्या व्यक्तिने नेहमी देश हिताच्या कार्यात भाग घेतला पाहिजे। यावेळी, खामकर यांनी खासदार सिन्हा यांचे आभार मानले आणि माझी, ज्या उद्देशासाठी अधिकृत खासदार प्रतिनिधि म्हनुन नियुक्ती केली आहे, ते कार्य निष्ठापूर्वक पार पाडिल अशी ग्वाही दीली आहे !

## सरदार रघुजी भोसले यांची ऐतिहासिक तलवार महाराष्ट्रात परतणार

# राज्य सरकारने लंडनमधील लिलाव जिंकला हा महाराष्ट्राचा विजय-आशिष शेलार

**मुंबई (वृत्तसंस्था)**-सरदार रघुजी भोसले यांची ऐतिहासिक तलवार महाराष्ट्र सरकारने लिलावात जिंकली असून महाराष्ट्रात आणण्यात येणार असल्याची माहिती सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी दिली आहे. लंडनहून ही शौर्याची निशाणी आता आपल्या मातीत परत येणार असून, हा महाराष्ट्राचा विजय असल्याची प्रतिक्रिया शेलार यांनी दिली आहे.आशिष शेलार यांनी ट्विट करत म्हणाले, छत्रपती शाहू महाराजांच्या काळातील मराठा सैन्यातील थोर सरदार रघुजी भोसले यांची ऐतिहासिक तलवार महाराष्ट्र सरकारने लिलावातून जिंकली होती, लंडनहून ही शौर्याची निशाणी आता आपल्या मातीत परत येणार असून, हा महाराष्ट्राचा विजय आहे. ही तलवार म्हणजे मराठ्यांच्या शौर्याची, मुत्सद्देगिरीचे आणि वैभवाची अमूल्य निशाणी असून, अशा लिलावात पहिल्यांदाच आपण ऐतिहासिक वारसा जिंकून आणलेला आहे.पुढे ते म्हणाले, या ऐतिहासिक तलवारीचा लिलाव जिंकण्यापासून ते ती ताब्यात घेण्यापर्यंतच्या सर्व प्रक्रियेमध्ये महत्त्वाचे मार्गदर्शन आणि भूमिका असलेल्या माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी, भारताचे परराष्ट्र मंत्रालय, लंडन येथील भारतीय दूतावासाचे अधिकारी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि सांस्कृतिक कार्य विभागाचे सर्व अधिकारी यांचे मनःपूर्वक आभार!आपल्या मराठा साम्राज्यातील एक मौलिक आणि ऐतिहासिक ठेव असलेली, नागपूरच्या भोसले घराण्याचे संस्थापक राजे रघुजी भोसले यांची ऐतिहासिक तलवार ही लिलावात निघाली होती. ती राज्य सरकारने २९ एप्रिल रोजी खरेदी केल्यानंतर, आज त्याचा प्रत्यक्ष ताबा राज्य सरकारकडे आला आहे.माझे सहकारी आणि राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी लंडनमध्ये हा ताबा स्वीकारला. काही तांत्रिक कारणांमुळे ती मध्यस्थामार्फत खरेदी करावी लागली होती. पण, आता ती त्या मध्यस्थामार्फत सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता करीत त्यांनी ताब्यात घेतली आहे.आता ही तलवार लवकरच महाराष्ट्रात येईल आणि त्याचा कायमस्वरुपी ताबा हा राज्य सरकारकडे असेल. छत्रपती शाहू महाराजांनी 'सेनासाहिबसुभा' ही उपाधी राजे रघुजी भोसले यांना दिली होती. राजे रघुजी भोसले यांनी अनेक युद्धमोहीमांचे नेतृत्त्व करीत मराठा साम्राज्याचा बंगाल, ओडिशापर्यंत विस्तार केला होता. दक्षिण भारतात सुद्धा त्यांनी आपला लष्करी आणि राजकीय दबदबा निर्माण केला होता.ही तलवार मराठा शैलीच्या फिरंग पद्धतीच्या तलवारीचा उत्कृष्ट नमुना आहे. एकधारी पाते, सोन्याचे नक्षीकाम हे या तलवारीचे वैशिष्ट्य आहे. युरोपिय बनावटीचे पाते हे त्या काळात प्रसिद्ध होते. या पात्याच्या पाठीवर तळाशी 'श्रीमंत रघोजी भोसले सेनासाहिबसुभा' असे सोन्याच्या पाण्याने लिहिले आहे. १८१७ मध्ये नागपुरात ईस्ट इंडिया कंपनीने भोसल्यांच्या खजिन्याची लूट केली होती. त्यात ही तलवार नेली असावी, असा जाणकरांचा अंदाज आहे. आता ही तलवार अधिकृतपणे राज्य सरकारच्या ताब्यात आल्याचा आम्हाला विशेष आनंद आहे.



# नवनियुक्त सीओ यांना बीड शहर बचाव मंचने शहराच्या समस्या दिल्या अवगत करून

## शहर नागरी समस्यांच्या विळख्यात-बीड शहर बचाव मंच शिष्टमंडळाने घेतली सिओची भेट



**बीड । प्रतिनिधी**

नगर परिषद,बीड चे, नव्याने रुजू झालेले,मुख्य कार्यकारी अधिकारी शैलेश फडसे यांना समक्ष भेटून शहरातील रस्ते, पाणी,स्वच्छता,वीज,मोकाट जनावरे,हायवे वर युटर्न तयार करा,रहदारी, अतिक्रमणे,अशा सर्वच समस्या 'बीड शहर बचाव मंच' चे पदाधिकारी यांनी मांडल्या.तपशीलवार चर्चा झाली.रस्त्यांचे काम वगळता,बाकी समस्यांचे निराकरण प्राधान्याने, तातडीने करण्याचे आश्वासन दिले आहे. शहरवासियांच्या वतीने त्यांचे 'मंचा'ने व विविध जन संघटनांनी स्वागत केले व निवेदन केले,दिले.

प्राचार्य डी.जी.तांदळे,मार्गदर्शक,बीड शहर बचाव मंच. शहरातील सर्वच भागातील रस्त्यांची खड्डे तात्काळ बुजवण्यात यावेत.परतीच्या पावसाच्या अगोदर, शहरामध्ये मोठ्या प्रमाणावर सर्वच भागांमध्ये जागोजाग निर्माण झालेले कचऱ्याचे डिगारे उचलण्याची तसेच नालेसफाईची मोहीम राबवण्यात यावी व तुंबलेल्या नाल्या स्वच्छ करून मोकळ्या करण्यात याव्यात, जेणेकरून आपल्याला ऐनवेळी पावसामुळे घडणारा अनर्थ तसेच नागरिकांची होणारी तारांबळ टाळता येईल.शहरातील सर्वच भागांमध्ये तसेच मुख्यत्वे करून विस्तारित भागांमध्ये पथदिव्यांचा फार मोठा तुटवडा आहे. बऱ्याच भागामध्ये पथदिव्यां अभावी रात्री नागरिकांना अंधाराचा सामना करावा लागतो. प्रामुख्याने महिला-भगिनी जेष्ठ नागरिक यांना टवाळखोर लोकांसह कुत्रे व मोकाट जनावरांचा ही त्रास मोठ्या प्रमाणावर सहन करावा लागत आहे. तरी अशा सर्व परिसरांमध्ये पथदिव्यांची संख्या वाढविण्यात यावी व तातडीने पथदिवे बसविण्यात यावेत.बीड शहर बचाव मंचाच्या वतीने सर्वे करून शहरातील व विस्तारित शहरातील सर्वच भागातील पथदिवे लावण्याच्या गरजेनुसार यादी नगरपरिषद विद्युत विभागासाठी सादर करत आहोत.बीड शहराला होणारा पाणीपुरवठा नियमितपणे प्रत्येक पाच दिवसाला करण्यात यावा,

नगरपरिषद महसूल कर वसुली विभागातील कर्मचाऱ्यांच्या कडून नागरिकांना मोठ्या प्रमाणावर अडचणी येत असून या सर्व अडचणी तातडीने दूर करण्यात याव्यात. कर भरणे वसुली प्रक्रियेमध्ये सुधारणा करण्यात याव्यात. नागरिकांची होणारी गैरसोय समजावून घेऊन दूर करण्यात यावी व सोयीस्कर पद्धतीने कर भरून घेण्यात येण्यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात बंद भागातील घंटागाड्या तसेच कचरा उचलणारे ट्रॅक्टर्स तात्काळ चालू करण्यात यावेत.मोकाट कुत्रे व मोकाट जनावरे यांच्यामुळे शहरांमध्ये अपघाताचे प्रमाण व ट्रॅफिक जामचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे तरी मोकाट कुत्रे व जनावरे यांचा तात्काळ बंदोबस्त करण्यात यावा, नगर रोड वरील रस्ता दुभाजकांमध्ये यू टर्न ठेवण्यात येण्याच्या संदर्भामध्ये नगरपरिषद प्रशासनाने ही योग्य ती पावले उचलावीत,यासाठी बीड शहर बचाव मंच शिष्टमंडळाने बीड न.प.चे सिओ यांची भेट घेऊन चर्चा करून समस्या सोडवण्यासाठी आग्रही मागणी केली आहे.

# मांडवे येथे विठ्ठल-रुक्माई मूर्ती स्थापना उत्साहात संपन्न



**मांडवे । ईश्वर निमसे**

मांडवे (ता. नगर) येथे विठू माऊलीच्या नामस्मरण गजरात व भक्तीभावाच्या वातावरणात विठ्ठल-रुक्माई मूर्तीची स्थापना जल्लोषात करण्यात आली. बँड पथक, मृदुंग, टाळ-चिपळ्यांच्या गजरात ग्रामस्थांनी एकत्र येऊन विठ्ठल-रुक्माईंची मूर्ती गावातील मंदिरात विधीवत प्रतिष्ठापित केली.

विशेष म्हणजे ही मूर्ती थेट पंढरपूर येथून आणण्यात आली होती. मूर्ती स्थापनेनिमित्त दोन दिवसीय कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. कीर्तनाच्या माधुर्याने व हरिनामाच्या गजराने संपूर्ण गाव भक्तिमय झाले होते.गावात दरवर्षीप्रमाणे यंदाही दहा दिवसीय सप्ताहाचे आयोजन करण्यात येणार असून हा धार्मिक सोहळा गेली पंचवीस वर्षे अखंडितपणे सुरू आहे. ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे आणि भक्तीभावामुळे यंदाचा सोहळा अधिकच भव्य व अविस्मरणीय ठरला.

# ठाण्यातील गोपाल भानुशाली यांना भारत समाज भूषण पुरस्कार जाहीर

**ठाणे । प्रतिनिधी**



धर्मवीर छत्रपती संभाजी प्रतिष्ठान महाराष्ट्र च्यावतीने दिला जाणारा भारत समाज भूषण पुरस्कार यंदा ठाणे शहरातील सामाजिक कार्यकर्ते श्री गोपाल लालजी भानुशाली यांना जाहीर करण्यात आला आहे. दरवर्षी धर्मवीर छत्रपती संभाजी राजे प्रतिष्ठान निवड समिती व प्रा. डॉ बी एन खरात संचालक समृद्धी पब्लिकेशन सिंधुदुर्ग यांनी दिली आहे प्रतिष्ठानच्यावतीने दरवर्षी विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा भारत समाज भूषण पुरस्काराने सन्मानित केले जाते यावर्षी समाज प्रबोधन, सामाजिक शैक्षणिक दुर्ग सर्वधन ग्रंथालय अशा विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या मान्यवरांना सदर पुरस्काराने सन्मान करण्यात येते. सदर पुरस्कार सोहळा साई नगरी शिर्डी येथे येत्या १७ ऑगस्ट रोजी पार पडणार असून प्रसंगी सदर सोहळ्यास खासदार भाऊसाहेब वाकचौरे तसेच मराठी सिने अभिनेते विजय पटवर्धन आदी मान्यवर उपस्थित राहणार आहे.

# आदर्श विद्यालयात स्वातंत्र्य दिनानिमित्त निबंध स्पर्धा संपन्न



**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील बनसारोळा येथे स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून आदर्श माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत पाचवी ते बारावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. एकूण ७० विद्यार्थ्यांनी देशभक्ती, स्वातंत्र्याचे महत्त्व आणि आपल्या देशाच्या गौरवशाली परंपरेवर आधारित विषयांवर सुंदर निबंध लिहिले.स्पर्धेचे आयोजन करताना सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री. रोकडे एस. व्ही. व श्री. मांदळे एस. सी. यांनी विशेष पुढाकार घेतला. स्पर्धा सुरळीत पार पडावी यासाठी शिक्षकवर्गानेही सक्रिय सहकार्य केले. मुख्याध्यापिका श्रीमती सिंधुताई चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण उपक्रम अत्यंत शिस्तबद्ध वातावरणात पार पडला.या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमध्ये लेखनकौशल्य वाढीस लागले तसेच देशभक्तीची भावना दृढ झाली. विजेत्या विद्यार्थ्यांना येत्या स्वातंत्र्य दिन सोहळ्यात प्रमाणपत्र व पारितोषिके देण्यात येणार आहेत.हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

# पोलिस उपनिरिक्षक स्वरूपा नाईकवाडे यांना महाराष्ट्र शासनाचा विशेष सेवा मेडल जाहीर

## गडचिरोली येथील नक्षलग्रस्तभागात केली होती तीन वर्ष खडतर सेवा

**केज । प्रतिनिधी**

पोलिस उपनिरिक्षक स्वरूपा सुंदर संगीता नाईकवाडे ह्या जुन २०२२ मध्ये पी एस आय ची ट्रेनिंग पुर्ण केल्यानंतर प्रथम नेमणूक त्यांना गडचिरोली येथे देण्यात आली एक महिना गडचिरोली येथे परत नक्षल विरोधी मोहिमेत काम करण्यासाठी त्यांना विशेष ट्रेनिंग देण्यात आली

एक महिन्यानंतर त्यांना धानोरा येथील पोलिस ठाणे येथे नेमणुक देण्यात आली वर्ष २०२२ ते २०२५ ह्या तीन वर्ष्यात स्वरूपा नाईकवाडे यांनी अनेक मोहीमेत भाग घेतला अति दुर्गम भागात त्यांनी चांगले काम केले तेथील आदिवासी भागातील नागरिकांची उत्तम सेवा केली महाराष्ट्र शासनाच्या अनेक योजना



अधिवासी बांधवा पर्यंत पोहचवल्या तरुणाई

ला शासकीय निमशासकीय सेवेत नौकरी च्या खूप संधी आहेत त्यासाठी मार्गदर्शन शिबिरात कार्य केले पॉक्सो अंतर्गत अनेक गुन्ह्यात त्यांनी मुलींना न्याय मिळऊन देण्याचे काम केले. त्या कामी त्यांना पोलिस अधीक्षक गडचिरोली यांच्या हस्ते प्रशस्ती पत्रही देण्यात आले या तीन वर्ष्यातील त्याच्या चांगल्या कामा बद्दल पोलिस उपनिरिक्षक स्वरूपा नाईकवाडे यांना महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार पोलिस विशेष सेवा पदक जाहीर करण्यात आहे १५ ऑगस्ट रोजी त्यांना हे पदक प्रदान करण्यात येणार आहे तीन वर्षाच्या छोट्या कालावधी मध्ये हे पदक त्यांना मिळाल्या बद्दल स्वरूपा नाईकवाडे यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे .

# डॉ.विजयकुमार गावित यांच्या कार्यावर निबंध स्पर्धा: विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**नंदुरबार । दिपक गोसावी**

महाराष्ट्राचे माजी आदिवासी विकास मंत्री आमदार डॉ. विजयकुमार गावित यांच्या वाढदिवसानिमित्त विजय गौरव समितीने आयोजित केलेल्या निबंध लेखन स्पर्धेला विद्यार्थ्यांकडून उदंड प्रतिसाद मिळाला. नंदुरबार येथील एकलव्य विद्यालयातील ५६ विद्यार्थ्यांसह नंदुरबार शहरातील इतर शाळांमधील सुमारे ३०० हून अधिक विद्यार्थ्यांनी स्पर्धेत भाग घेऊन डॉ. गावित यांच्या नेतृत्वाखालील जिल्हा विकास, त्यांचे योगदान, आणि रस्ते, जल, तसेच आरोग्य विकासावरील कार्यावर निबंध लिहिले.




एकलव्य विद्यालयात पार पडलेल्या या स्पर्धेचे उद्घाटन पश्चिम खान्देश भिल्ल सेवा मंडळाचे अध्यक्ष डॉ. सुहास नटावदकर यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी बोलताना, जिल्ह्याच्या विकासाची दिशा युवकांच्या विचारांतून घडते, असे सांगत त्यांनी सर्जनशील लेखनाचे महत्त्व स्पष्ट केले. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमध्ये विकासाची बीजे रुजवली गेली, असे आयोजकांनी सांगितले.

प्रा. ईश्वर धामणे यांनी डॉ. गावित यांच्या कार्याची माहिती दिली, तर प्रा. गिरीश पवार यांनी कार्यक्रमाचे उत्कृष्ट संयोजन केले. स्पर्धेचे नियोजन, पर्यवेक्षण आणि व्यवस्थापनामध्ये प्रा. चंद्रकांत देसले, किरण देहणकर, श्रावण हुबाळे यांनी विशेष परिश्रम घेतले. या अनोख्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना डॉ. गावित यांच्या कार्याची सखोल माहिती मिळाली आणि त्यांच्या विचारशक्तीला चालना मिळाली.

## स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने हर घर तिरंगा या उपक्रमाच्या अंतर्गत

# राष्ट्रीय माध्यमिक, उच्च माध्यमिक व व्यवसाय अभ्यासक्रम विद्यालय बीड येथे ध्वजारोहण संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने हर घर तिरंगा या उपक्रमाच्या अंतर्गत राष्ट्रीय माध्यमिक व उच्च माध्यमिक व व्यवसाय अभ्यासक्रम विद्यालय बीड, प्रियदर्शनी प्राथमिक विद्यालय बीड व किशोरी इंग्लिश स्कूल, बीड येथे दिनांक १३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०२५ या कालावधीत दररोज झेंडावंदनाचा कार्यक्रम संपन्न होणार आहे.दिनांक १३.०८.२०२५ वार बुधवार रोजी राष्ट्रीय माध्यमिक विद्यालयात हर घर तिरंगा या उपक्रमाच्या अंतर्गत ध्वजारोहणाचा कार्यक्रम प्रमुख पाहुणे चार्टर्ड अकाउंटंट मा. श्री. गिरीषजी गिलडा साहेब यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. या




कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्राचार्या श्रीमती तायडे डी. ओ. ह्या होत्या.

ध्वजारोहण कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून व अभिवादन करून करण्यात आली. त्यानंतर ठीक सकाळी ७:४५ वाजता ध्वजारोहण कार्यक्रम संपन्न झाला.ध्वजारोहणाच्या कार्यक्रमानंतर प्रमुख पाहुणे चार्टर्ड अकाउंटंट श्री. गिरीशजी गिलडा साहेब यांचे स्वागत राष्ट्रीय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय बीडच्या प्राचार्या श्रीमती तायडे डी.ओ.व प्रियदर्शनी प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक पाटील ए.आय.यांनी केले. या कार्यक्रमात या कार्यक्रमास किशोरी इंग्लिश स्कूल प्राचार्या मेघा बिर्ला व प्रियदर्शनी प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक पाटील ए. आय. व शाळेतील सर्व विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# तळोदा उपजिल्हा रुग्णालयात कै.कलावती पाडवी फाऊंडेशनच्या रुग्ण सहाय्यता केंद्राचा शुभारंभ

**नंदुरबार । दिपक गोसावी**

तळोदा जि.नंदुरबार येथील उपजिल्हा रुग्णालयात गरजू रुग्णांना आरोग्यसेवा आणि मार्गदर्शन मिळवून देण्यासाठी कै.कलावती पाडवी फाऊंडेशन, सोमावल यांच्या वतीने रुग्ण सहाय्यता केंद्र सुरू करण्यात आले आहे. आमदार राजेश पाडवी यांच्या हस्ते या केंद्राचे नुकतेच फीत कापून उद्घाटन झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी फाऊंडेशनच्या अध्यक्षा प्रियाताई राजेश पाडवी होत्या.यावेळी बोलताना आमदार राजेश पाडवी यांनी सांगितले की, २०१९ पासून हे फाउंडेशन गरीब आणि गरजू लोकांसाठी आरोग्य सेवा उपलब्ध करून देत आहे. हे रुग्ण सहाय्यता केंद्र आरोग्य सेवा आणि रुग्णांमध्ये समन्वयक म्हणून काम करेल. या केंद्राद्वारे प्रत्येक गरजू व्यक्तीला सरकारी आरोग्य योजनांचे कार्ड तयार करून देण्याचा उपक्रमही राबवला जाणार आहे. या केंद्राच्या माध्यमातून रुग्णांना त्यांच्या आरोग्याच्या समस्यांवर उपचारासाठी योग्य मार्गदर्शन,२४ तास मोफत म्बुलन्स आणि शववाहिनी सेवा उपलब्ध



होईल. तसेच, फाऊंडेशनच्या माध्यमातून भविष्यात विविध आरोग्य शिबिरे आयोजित केली जाणार आहेत. या केंद्राचे समन्वयक म्हणून योगेश मराठे काम पाहतील.कार्यक्रमाला अभिषेक पाटील, नेहा पाडवी, माजी नगराध्यक्ष अजय परदेशी, जिल्हा मंत्री बळीराम पाडवी, वैद्यकीय अधीक्षक रोहित वसावे,जितेंद्र सूर्यवंशी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. भाजपा शहराध्यक्ष गौरव वाणी यांच्या वतीने रुग्णांना निश्चय पोषण आहार किटचे वाटपही करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिनेश मराठे यांनी केले, तर योगेश मराठे यांनी आभार मानले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077